**“फेब्रुवारी २०१७” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

## (अ) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>

- दिनांक २ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये गट-अ संवर्गातील शासकीय अधिकाऱ्यांचे “कार्यमुल्यमापन अहवाल” सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षापासून लिहिण्यासाठी नमुना निश्चित करण्यात आले आहेत तसेच तत्संबंधीच्या मार्गदर्शक सूचना देखील दिल्या आहेत.
- दिनांक ४ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Benchmark Criteria) विहित करण्यात आला आहे.
- दिनांक ४ फेब्रुवारी २०१७ च्या दोन शासन निर्णयान्वये मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीतील चौरस आहारगृहातील महानगर गॅस लिमिटेडव्दारे पाईपलाईन जोडणीच्या कामास अनुक्रमे ८०.०० लाख व ४०.०० लाख इतक्या अंदाजित रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये धुळे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीमध्ये अंतर्गत दुरुस्ती करण्याच्या एकूण रु.३५.८४ लाख इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या संस्थेच्या इमारतीचे विस्तारीकरण करण्याच्या रु.३४२.९६ लाख इतक्या रकमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक २२ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) मधील परंतुकानुसार Appex Scale (Level १७ in the Pay Matrix) या संवर्गात एक पद तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १ फेब्रुवारी २०१७ पासून पुढे एक वर्षाच्या कालावधीकरिता निर्माण करण्यास केंद्र शासनाच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधीन मंजूर करण्यात आले आहे.
- दिनांक २३ फेब्रुवारी २०१७ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये याच विभागाच्या दिनांक ४ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक ३ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील व बृहन्मुंबई शासकीय कार्यालयातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या संवर्गातील सरळसेवा कोटयातील अनुक्रमे ३३, ४५, २२ अशी १०० पदे वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २ जून २०१५ च्या कमाल मर्यादेतून वगळण्यात येऊन, ही सरळसेवा कोटयातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांच्या क्रमांक-२५०१४/०५/२०१६-एआयएस-II, दिनांक १७ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील तात्पुरते निवृत्ती-वेतनधारकांच्या संदर्भात “Revision of Provisional Pension sanctioned under rule-69 of the CCS (Pension) Rules 1972” चे ऑफिस मेमोरेन्डम क्रमांक-३८/६/२०१०-पी.ॲण्ड पी.डब्ल्यू.(ए)(पीटी), दिनांक १८ मार्च २०१३ ची प्रत दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ च्या पत्रान्वये माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
- दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील २१८ अस्थायी पदांना दिनांक ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ च्या शासन आदेशान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) करिता सेवार्थ प्रणालीतील पदांवर नियंत्रण राहण्यासाठी, यापुढे वित्त विभागाने दिलेले संकेत वर्ण व परवलीचा शब्द यांचा वापर करुन सेवार्थ प्रणालीत प्रवेश करुन, स्थायी तसेच अस्थायी पदे [Permanent & Temporary Posts] तसेच भविष्यातील विविध संवर्गातील पदांचा (नवीन पदे, अस्थायी पदे, निरसित पदे, श्रेणीवाढ / श्रेणी अवनत / रुपांतरित पदे इत्यादी) तपशील भरण्यासाठी प्रशासकीय

विभागाच्या सचिवांना प्रदान केलेले अधिकार, नियंत्रक अधिकारी म्हणून सह / उपसचिव (साप्रवि खुद्द आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग यांना प्रत्यार्पित करण्यात आले आहेत.

- दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेव्दारे सरळसेवेने एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणास रुजू होताना, काही अटी व शर्ती अधीन गट-अ व गट-ब मधील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांकडून अनुक्रमे रु.५.०० लाख व ३.०० लाख इतक्या रकमेचे बंधपत्र लिहून घेणे अनिवार्य केले आहे.

- **(ब) <u>प्रशिक्षण</u>**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा मुख्य परीक्षव्दारे मुलाखतीस शिफारसप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांची मुलाखतीपूर्वी वैद्यकिय तपासणी, यापुढे आयोगाकडून उमेदवारांची शासनाकडे अंतिम शिफारस केल्यानंतर दोन महिन्यात करण्यात येईल तसा शासन निर्णय दिनांक २ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

- दिनांक ९ फेब्रुवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये भारतीय लोकप्रशासन संस्था, महाराष्ट्र शाखेमार्फत विविध विषयांच्या अनुषंगाने होणाऱ्या उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमास मान्यता व एक दिवशीय अनिवासी प्रशिक्षण शुल्काचा प्रति प्रशिक्षणार्थी रु.६००/- इतका दर निश्चित करण्यात आला आहे.

- दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखक यांचे सन २०१७ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग दिनांक १ मार्च ते २१ मार्च २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

**<u>पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक २ फेब्रुवारी २०१७ च्या शासन आदेशान्वये कक्ष अधिकारी पदावरील सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीतील नियमित निवडसूच्या सुधारित करुन ३०२ कक्ष अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या नियमित करण्यात आल्या आहेत. त्यांना नियमित पदोन्नतीचा व ज्येष्ठतेचा दिनांक देण्यात आला आहे.

- कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन २००१ ते २००६ या कालावधीतील ज्येष्ठतासूच्या काही कारणास्तव दिनांक १८ फेब्रुवारी २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये तात्पुरत्या स्वरुपात सुधारित करण्यात आल्या आहेत.

- "सरळसेवा सहायक कक्ष अधिकारी (मुख्य) परीक्षा २०१६" मधील शिफारस प्राप्त ४३ उमेदवारांचे दिनांक ३ फेब्रुवारी २०१७ च्या ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले.

- दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ च्या शासन आदेशान्वये सन २०१३-१४ व २०१४-१५ या कालावधीत मंत्रालयीन उपसचिव पदावर तदर्थ स्वरुपात दिलेल्या ६८ अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या नियमित करण्यात आल्या आहेत. त्यांना उपसचिव पदावरील नियमित पदोन्नतीचा दिनांक देण्यात आला आहे.

- दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ च्या शासन आदेशान्वये सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीत मंत्रालयीन सहसचिव पदावर तदर्थ स्वरुपात दिलेल्या २४ अधिकाऱ्यांच्या पदोन्नत्या नियमित करण्यात आल्या आहेत. त्यांना सहसचिव पदावरील नियमित पदोन्नतीचा दिनांक देण्यात आला आहे.

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याला कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.

**(ड) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- भारतीय प्रशासन सेवा, सहसचिव, कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी या संवर्गाती अनुक्रमे १, १, २, २ अशा एकूण ६ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. एका कक्ष अधिकाऱ्याची बदली स्थगित करण्यात आली आहे.

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याला कक्ष अधिकारी पदाचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला आहे.

**********